पुणे शहर पोलीस

# दर्पण

जानेवारी २०२०

# लोकाभिमुख उपक्रम

लोकाभिमुख उपक्रम

# अन् झाली पोलिसांशी दोस्ती

## 'टाइम्स एनआयई न्यूजमेकर्स मीट'मध्ये विद्यार्थ्यांनी घेतली यंत्रणेची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पोलिसांचे काम कसे चालते, सायबर क्राइम रोखण्यासाठी काय उपाय केले जात आहेत, वाहतूक कोंडीवर पोलिस कसा मार्ग काढतात आणि अल्पवयीन गुन्हेगारांबाबत पोलिसांची भूमिका काय असते, असे अनेक प्रश्न शालेय विद्यार्थ्यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना विचारले आणि ज्येष्ठ अधिकाऱ्यांनीही त्यांच्या सर्व प्रश्नांना मोकळेपणाने उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांची भीती वाटण्याऐवजी पोलिस आपले मित्रच आहेत, अशी भावनादेखील विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाली.



'टाइम्स एनआयई न्यूजमेकर्स मीट'च्या वेळी विद्यार्थ्यांसमवेत उपस्थित (डावीकडून) पोलिस उपायुक्त (गुन्हे) बच्चन सिंग, सह पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, अतिरिक्त पोलिस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे आणि परिमंडळ एकच्या उपायुक्त स्वप्ना गोरे.



विद्यार्थ्यांना शस्त्रास्त्रांची माहिती देताना पोलिस अधिकारी.



उपायुक्त स्वप्ना गोरे यांच्यासमवेत सेल्फी घेताना विद्यार्थिनी.

निमित्त होते, पुणे पोलिस आणि 'द टाइम्स फाउंडेशन'तर्फे पुणे पोलिस आयुक्तालयात आयोजित करण्यात आलेल्या 'टाइम्स एनआयई न्यूजमेकर्स मीट'चे. 'एनआयई' उपक्रमात सहभागी असलेल्या शाळांमधील १७०हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनी या उपक्रमात सहभागी झाले होते. 'जाणून घ्या पुण्याची पोलिस यंत्रणा' अशी संकल्पना असलेल्या या कार्यक्रमात पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, सह पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अतिरिक्त पोलिस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे, पोलिस उपायुक्त (गुन्हे) बच्चन सिंग आणि परिमंडळ एकच्या उपायुक्त स्वप्ना गोरे उपस्थित होत्या.

पोलिसांचे कामकाज, त्यातील रोजची आव्हाने, सायबर गुन्हेगारी, वाहतूक कोंडी, अल्पवयीन गुन्हेगारी संदर्भातील विविध प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केले. विद्यार्थ्यांना सध्याच्या सायबर विश्वाबाबत सावध करताना डॉ. व्यंकटेशम म्हणाले, 'ऑनलाइन असताना तुम्ही केलेल्या प्रत्येक कृतीची नोंद होत असते. इंटरनेटवर वेगाने व्हायरल होणाऱ्या बोगस गोष्टींचे प्रमाण लक्षात घेऊन प्रत्येकाने डिजिटल जगातील आपल्या वावराबाबत सजग झाले पाहिजे. तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे पोलिस यंत्रणेला मदत होत आहे. विशेषतः वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर तंत्रज्ञानाच्या आधारावर कारवाई होत आहे,' असेही त्यांनी सांगितले.

'चित्रपटांमध्ये दाखवले जाते ते सर्व सत्य नसते,' असे चित्रपटात दाखवल्या जाणाऱ्या कारागृहाच्या चित्रणाच्या संदर्भात सांगून डॉ. शिसवे म्हणाले, 'गुन्हेगारांच्या पुनर्वसनासाठी पोलिस सतत प्रयत्नशील असतात. कारागृहात कौशल्य विकास व अन्य उपक्रमांमध्ये सहभागी होऊन अनेक जण पुन्हा योग्य मार्गावर येतात.' समूह छायाचित्र काढून कार्यक्रमाची सांगता झाली.

तत्पूर्वी, 'एनआयई' उपक्रमातील विद्यार्थ्यांनी पोलिसांनी महिला, ज्येष्ठ नागरिक, बालकांसाठी सुरू केलेले 'भरोसा' केंद्र आणि सेवा केंद्राला भेट देऊन तेथील कामाचे स्वरूप समजावून घेतले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी खास शस्त्रास्त्रांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. भरोसा केंद्र व सेवा केंद्राच्या भेटीवेळी बच्चन सिंह यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सिंग यांनी 'कौन्सेलिंग अँड रिफॉर्मेटिव्ह एज्युकेशन' अर्थात केअर उपक्रमाअंतर्गत अल्पवयीन गुन्हेगारांसाठी पुनर्वसन प्रक्रियेविषयी व नागरिकांशी संपर्क वाढविण्यासाठी हेल्पलाइन व व्हॉट्सअप क्रमांक सेवेविषयी माहिती दिली.

भरोसा व सेवा केंद्राला मोठा प्रतिसाद मिळत आहे. संबंधितांच्या तक्रारीचे पूर्ण निवारण झाले की नाही, याची पोलिसांकडून खात्री केली जाते. सप्टेंबर २०१८ला स्थापना झाल्यानंतर तेव्हापासून आजपर्यंत दोन लाख नागरिकांनी सेवा केंद्राला भेट दिली आहे. सहायक पोलिस निरीक्षक अश्विनी पाटील यांनी सायबर क्राइमविषयी, तर पोलिस निरीक्षक राजेश पुराणिक यांनी वाहतूक नियमनाविषयी मार्गदर्शन केले.

'हा उपक्रम अतिशय माहितीपूर्ण आणि खूप काही शिकवणारा होता. त्यातून आम्हाला पोलिस यंत्रणा कशी काम करते, हे जवळून पाहायला मिळाले. पोलिसांविषयीचे गैरसमज दूर झाले. भरोसा केंद्र, सेवा केंद्र तसेच अन्य हेल्पलाइनच्या माध्यमातून पोलिस यंत्रणा आपल्याशी मैत्रीच्या भावनेतूनच वागत आहे,' असे विद्या व्हॅली शाळेच्या क्रिश भारद्वाज या विद्यार्थ्याने सांगितले.



डॉ. के. व्यंकटेशम
पोलीस आयुक्त, पुणे

विकासाच्या दिशेने वेगाने मार्गक्रमण करणाऱ्या आणि विस्तारलेल्या पुणे शहरात कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवण्याचे आव्हान आहे. तंत्रज्ञान, साक्षरता आणि शिक्षण वाढल्यामुळे लोकांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. नागरिक परदेशात फिरून तेथील सुविधा पाहतात आणि त्याच धर्तीवर पुण्यातही बदल व्हावेत, असे त्यांचे मत असते. त्यामुळे पोलिसांकडून तंत्रज्ञानाचा वापर आणि मनुष्यबळाच्या प्रशिक्षणावर भर देण्यात येत आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांच्या अडचणी दूर करणे, तसेच गुन्हेगारांवर वचक बसविणे, यावर भर देण्यात येत आहे. पुणे शहर पोलीस दलाने तंत्रज्ञानाचा वापर, तसेच पोलिसांना प्रशिक्षण देत लोकोपयोगी विविध उपक्रम, योजना राबविण्यात आल्या आहेत. आगामी काळात लोकांच्या गरजा, प्रश्न लक्षात घेऊन त्या सोडविण्यावर भर दिला जाणार आहे. यासोबतच पुणेकरांना सुरक्षिततेची हमी देत खाकीचा दरारा उंचावण्यासाठी पुणे पोलीस दलाची वाटचाल सुरू आहे.

# खाकी बदलतेय

गुन्हेगारांवर वचक निर्माण करणे, तसेच त्यांनी गुन्हा करू नये, यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई केली जात आहे. यासह प्रभावी पोलिसिंगसाठी पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले आहे. त्यामध्ये तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात आला आहे. यासोबत गुन्हे घडू नयेत, यासाठी २०१९ मध्ये वारंवार गुन्हे करणाऱ्या १३८२ जणांवर गुन्हे शाखेकडून प्रतिबंधक कारवाई केली आहे. त्यात १८४ जणांना तडीपार केले असून, १७ जणांवर एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्ध करण्यात आले आहे.

**क्रिमिनल इंटेलिजन्स सर्व्हेलन्स प्रोजेक्ट (क्रिप) :-**

या उपक्रमांतर्गत पोलीस ठाण्यांना त्यांच्या हद्दीतील रेकॉर्डवर असलेले आणि वारंवार गुन्हे करणारे गुन्हेगारांची झडती घेण्याचे टार्गेट देण्यात येते. तसेच, त्यांची बीट मार्शल, गुन्हे तपास पथकांकडून तपासणी केली जाते. त्यानुसार गत एक वर्षात २४ हजार ११८ गुन्हेगार तपासले. त्यापैकी ४८ टक्के गुन्हेगार सापडून आले. नियमित तपासणीमुळे गुन्हेगार गुन्हे करण्यापासून सावध राहतात. क्रिपमुळे गत एक वर्षात ११ टक्के गुन्ह्यात घट झाली आहे.

**थर्ड आय :-**

शहरातील गुन्ह्यांशी संबंधित डेटाचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये कोणत्या भागात कोणत्या प्रकारचे गुन्हे घडतात, कोठे गुन्हेगार वास्तव्यास आहेत, याची माहिती संकलित केली आहे. बीट मार्शल ते डीसीपी यांना गुन्हे प्रतिबंध आणि गुन्हेगारांवर नजर ठेवणे, या कामाची जबाबदारी वाटून देण्यात आली आहे. या उपक्रमाचा दुसरा भाग म्हणजे प्रभावीपणे गस्त घालणे. यासाठी पेट्रोलिंग क्यू आर कोड शहरातील दोन हजार गस्ती ठिकाणांवर लावण्यात आले आहेत. संबंधित पेट्रोलिंग करणारे पथक संबंधित ठिकाणी जाऊन मोबाइलमधून कोड स्कॅन करतो. त्यावरून कोणता मार्शल कोणत्या भागात पेट्रोलिंग करीत आहे, याची माहिती कंट्रोल रूमला मिळते. तिसरा भाग म्हणजे कोर्ट मॉनिटरिंग सिस्टिम हा आहे. पोलीस ठाण्यात दाखल गुन्हे कोणत्या न्यायालयात खटला दाखल आहे, त्याची तारीख, तसेच समन्स आणि अटक वॉरन्ट आदींबाबतची नोंद ठेवली जाते.

**पोलीस आयुक्त कार्यालय व्हॉट्स अ‍ॅप क्रमांक : -**

पोलीस आयुक्तांनी एक व्हॉट्स अ‍ॅप क्रमांक प्रसारित केला आहे. त्याद्वारे नागरिक थेट कॉल करून, तसेच एसएमएस पाठवून संपर्क करू शकतात. त्यावर तक्रार आल्यानंतर संबंधित पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षकास त्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले जातात. तक्रार करणाऱ्या नागरिकाची ओळख गोपनीय ठेवली जाते. अशाप्रकारे गत दीड वर्षात ५६ हजार नागरिकांनी कॉल्स केले आहेत. तसेच, कायदा आणि सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी घडलेली घटना तत्काळ पोलिसांना मिळावी, यासाठी पोलीस प्रायव्हेट सिक्युरिटी पार्टनरशिप प्रोग्रामही राबविण्यात येत आहे.

**चौकी सक्षमीकरण :-**

शहरातील ११० पोलीस चौक्यांचे सक्षमीकरण करण्यात आले आहे. वाहन दर्शनीय भागात वाहन लावणे. तसेच, चौकीत येणाऱ्या प्रत्येक तक्रारदाराच्या समस्यांची त्वरित नोंद घ्यावी आणि चौकीत आलेल्या लोकांशी चांगली वागणूक देत समस्यांचे निराकरण करण्याचे आदेश त्यांना देण्यात आले आहेत.

**सी थ्री :-**

शहरातील विविध भागांतील उद्योगपती, दुकानदार, सोसायट्यांनी रस्त्याच्या बाजूने लावलेल्या खासगी सीसीटीव्हींचे कॅमेऱ्यांचे जीओ टॅगिंग करण्यात आले आहे. गुन्हा ज्या ठिकाणी घडला, तेथे जिओ टॅगिंगच्या माध्यमातून सदर भागातील सीसीटीव्हींची माहिती काढून आरोपींची ओळख पटविण्यात येते. तसेच, तातडीने त्याचा माग काढण्यासाठी याचा उपयोग करण्यात येतो. याप्रकारे १९ हजार कॅमेरे प्रकल्पाशी जोडण्यात आलेले आहेत. त्याद्वारे १७८ गुन्हे उघडकीस आणून १४६ आरोपींना अटक केली आहे. तसेच, ५ कोटी १० लाखांचा ऐवज जप्त केला आहे.

**इंटरॲक्टिव्ह व्हाइस रिस्पॉन्स सिस्टिम (आयव्हीआर) :-**

पुणे शहर पोलीस दलाच्या नियंत्रण कक्षाला यापूर्वी दररोज सुमारे २० ते २२ हजार कॉल्स येत असत. त्यातील अनेक कॉल्स विनाकारण चुकीने केले जात असत. मात्र, आयव्हीआरमुळे तो कॉलची संख्या १ हजार ते बाराशे कॉल येत आहेत. या यंत्रणेमुळे पूर्वीच्या तुलनेत संकटात सापडलेल्या नागरिकांच्या मदतीला धावून जाण्याची गती वाढली आहे. नियंत्रण कक्षास कॉल आल्यानंतर अवघ्या दहा मिनिटांत संबंधित बीट मार्शल घटनास्थळी पोहोचून संकटात सापडलेल्या नागरिकास मदत करतो.

नागरिकांच्या तक्रारी अडीअडचणी सोडविण्यासाठी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यातील काही उपक्रमांमधून केलेल्या कामाची पोलीस महासंचालक यांनीही दखल घेतली आहे.

**सर्व्हिस एक्सलन्स व्हिजिटर असिस्टन्स सेवा ॲप :-**

नागरिक विविध अडीअडचणी, तक्रारी घेऊन पोलीस ठाण्यात जातात. तेथील पोलीस तक्रार घेत नाहीत. तसेच, कार्यवाही करीत नाहीत. अशा तक्रारी घेऊन नागरिक वरिष्ठांकडे धाव घेत होते. हा प्रश्न सोडविण्यासाठी ▶▶पान ८ वर...



**तेरा कोटींचा मुद्देमाल नागरिकांना परत**

*आर्थिक आणि सायबर गुन्हे शाखेच्या सायबर सेल पोलीस ठाण्याने ऑनलाइन पद्धतीने रक्कम घेण्याप्रकरणी दाखल विविध गुन्ह्यांत ४७७ तक्रारदार नागरिकांच्या खात्यातून गेलेली १० कोटी २१ लाख रुपयांची रक्कम पुन्हा नागरिकांना परत मिळवून दिली आहे. तसेच २०१९ या वर्षभरात पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत घरफोडी, चोरी, दरोडा, वाहनचोरी आदी २२० गुन्ह्यांतील ३ कोटी ७ लाख रुपयांचा मुद्देमाल परत केला आहे.*



पुण्यनगरी – दि. ४ जानेवारी, २०२०

# खाकी बदलतेय





[illegible]

### पुणे पोलिसांच्या उपक्रमांना मिळालेले पुरस्कार

[illegible]

**बडीकॉप, दामिनी पथक आणि पोलिसकाका उपक्रम :-**



[illegible]

**• शब्दांकन - प्रशांत शिंदे**

Sakal Times - 13 January, 2020

# Follow traffic rules to earn rewards



**POSITIVE ACTION:** (from left) Jt CP Ravindra Shisve, CP Dr K Venkatesham, Bajaj Allianz CEO and MD Tapan Singhel during the press conference on Thursday. ANAND CHAINI

■ **ATISHAY JAIN**
reporters@sakaltimes.com

**PUNE:** Bajaj Allianz, in collaboration with Pune traffic police, has announced a special pricing on motor insurance policies for those who have ardently followed traffic rules and regulations in the city starting from January 2.

The pilot project will be conducted in Pune and depending on the response, the incentive might be extended to more cities and states.

Addressing media, Commissioner of Police K Venkatesham said, "Pune is the home to one of the highest number of two-wheelers in the country and the number is growing rapidly. In 2018, 240 accidents were reported in the city, which reduced to 190 in 2019. The number has gone down significantly, and this year we hope to reduce it further by 50 per cent. The 'Abhaar Yojna' started in 2019, where drivers were given discount coupons if they had no charges in their record was a success. This year when we were thinking what more could be done, we were approached by Bajaj Allianz to launch this initiative."

Bajaj Allianz General Insurance MD and CEO Tapan Singhel said, "As far as my knowledge goes, we are the first to launch such an initiative in the country where the law-abiding commuter is rewarded rather than punishing the violator. The obsession with negativity clouds our view on positivity. We have only focused on the 1 per cent negative aspect and left the 99 per cent positive behaviour unappreciated. We want to reward those who follow traffic rules and regulations by giving them special pricing on their motor insurance. We hope this will inspire other companies to launch incentives as well."

People who apply for insurance will receive 5 per cent to 7 per cent off on the deal depending on their history of driving charges. One year will be taken as consideration period but if the person claims to have a longer period without any charges, it can even extend to 3 years and will be awarded a higher discount. The company will take the customer's appeal and their data will be cross-checked at the police department. "If even one life is saved, then we will consider it as a success," said Singhel.

TIMES OF INDIA - 24 January, 2020

# NIE Newsmakers' Meet offers police work insight

TIMES NEWS NETWORK



Students at Pune police commissioner's office with (from left) DCP (crime) Bachchan Singh, joint commissioner of police Ravindra Shisve, commissioner of police K Venkatesham, ACP (crime) Ashok Morale and DCP (Zone-1) Swapna Gore

**Pune:** A deeper insight into the working of the police force and interaction with the senior officers marked the "Times NIE Newsmakers' Meet 2019-20" held in association with the city police and The Times Foundation at the police commissioner's office on Wednesday.

Over 170 students from NIE member schools participated in the meet, titled "Knowing Your City Police".

The forum facilitated a dialogue between the students and police officers. The panel of police officers comprised commissioner of police K Venkatesham, joint commissioner of police Ravindra Shisve, additional commissioner of police (crime), Ashok Morale, deputy commissioner of police (crime) Bachchan Singh and deputy commissioner of police (Zone-I), Swapna Gore.

A volley of questions on challenges in policing, cybercrime, traffic issues and juvenile crimes, among others, was posed before the senior authorities. Warning students of the vulnerability in cyber space, Venkatesham said, "You should be very careful of what you are sharing on the digital space." He, however, affirmed that the use of technology would help in effective policing, especially to keep a check on traffic violators.

"Films are anything but normal," said Shisve on the portrayal of jails on the silver screen. He said a lot of emphasis was laid on reformative measures of the criminals and around 80-90% got reformed through engagement in skill-set building activities undertaken in the jails.

Earlier, the students visited the Bharosa cell that included units for women, senior citizens and child-care; and the SEVA (Service Excellence and Victim Assistance) cell. A weapon display was also organized to apprise students of the arms used in different combat operations.

In the morning session, Bachchan Singh briefed the students about the working of the Bharosa and SEVA cells. This was followed by a question-answer session. Singh said the police were adopting reformative measures for the juveniles under the CARE (Counselling and Reformative Education) programme. He also said the Bharosa cell institutionalized in January 2019 was an effort to address the grievances of the general public before resorting to the legal recourse.


"The SEVA cell acts as a centralized feedback centre that keeps a track of all the visitors at the police station and analyses whether the concerned issues are resolved after the visit," he said. An informative session on cyber-crime and traffic regulation was conducted by assistant police inspector Ashwini Patil and police inspector Rajesh Puranik, respectively.

PuneMirror - 16 January, 2019



# Constables' training with noted wrestler packs a hefty punch

**Three-time Maharashtra Kesari winner, ACP Vijay Choudhary, has revamped the mud ring at Shivajinagar headquarters; wants cops to win in state-level event**





महाराष्ट्र टाइम्स – दि. २० जानेवारी, २०२०

# ‘चारित्र्य पडताळणीत करू बेशिस्तीचा उल्लेख’



**शहराची भीषण वाहतूक समस्या सोडविण्यासाठी प्रथमच अतिरिक्त आयुक्त पदावरील अधिकाऱ्याकडे वाहतूक विभागाचा पदभार सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार डॉ. संजय शिंदे यांनी पदभार स्वीकारला आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे यांच्याशी कुलदीप जाधव यांनी संवाद साधला.**

मटा टॉकटाइम

■ **वाहतूक समस्या आटोक्यात आणण्यासाठी कोणत्या उपाययोजना आहेत?**

वाढती वाहनसंख्या हे वाहतूक समस्येचे मूळ आहे. बेशिस्त वाहनचालक, वाहनतळांचा अभाव आदी गोष्टी वाहतूक कोंडीत आणखी भर घालतात. सार्वजनिक वाहतूक सक्षम झाल्यास खासगी वाहनांचा वापर कमी होईल. मात्र, सध्या बेशिस्त वाहनचालकांना आवर घालणे गरजेचे असून, त्यांना कायद्याचा धाक बसणे आवश्यक आहे. अशा चालकांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे. ‘सीसीटीव्ही’ कॅमेऱ्याचे फुटेज व ‘सतर्क पुणेकर’ या मोबाइल ‘अॅप’च्या माध्यमातूनही कारवाई होत आहे. वाहनचालकांचे प्रबोधन करणे आणि नियम पाळण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे, या योजनादेखील आहेत. वाहतूक पोलिसांकडून वाहनचालकांचे समुपदेशन केले जाते; तसेच, वाहतुकीचा दंड प्रलंबित नसलेल्या व नियमांचे पालन करणाऱ्यांना ‘आभार’ योजनेअंतर्गत ‘डिस्काउंट कूपन’ दिले जात आहे. आतापर्यंत ६० हजार वाहनचालकांनी त्याचा लाभ घेतला आहे.

■ **प्राणांतिक अपघात कमी करण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी काय केले जात आहे ?**

गेल्या वर्षात प्राणांतिक अपघात १८ टक्क्यांनी कमी झाले असून, ते प्रमाण कमी करण्यासाठी आणखी प्रयत्न केले जाणार आहेत. मी रत्नागिरीला पोलिस अधीक्षक असताना, तेथे एक प्रयोग राबविला होता. प्राणांतिक अपघात करणाऱ्या वाहनचालकाचा परवाना निलंबित केला जायचा. अशा वाहनचालकांना वाहन चालविण्यापासून काही महिने दूर ठेवावे, हा त्यामागील उद्देश होता. प्रादेशिक परिवहन विभागाच्या मदतीने ही योजना पुण्यात राबविण्याचा विचार आहे. वाहतुकीच्या नियमाचा भंग करणे, हादेखील गंभीर गुन्हा आहे. वाहनचालकांना तशी जाणीव करून देण्याची वेळ आली आहे. एखादी सरकारी, खासगी नोकरी ‘जॉइन’ करताना किंवा अन्य कारणासाठी नागरिकांना पोलिसांकडून चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची गरज भासते. ते देताना, यापुढे फौजदारी गुन्ह्यांसह वाहतूक नियमभंगाच्या केसेसचाही आढावा घेतला जाणार आहे. संबंधिताच्या नावे वाहतूक नियमभंगाचे गुन्हे प्रलंबित असतील किंवा मोठ्या संख्येने नियमभंग केल्याचे ‘रेकॉर्ड’ असेल, तर त्यांच्या बेशिस्तीचा उल्लेख चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रात केला जाणार आहे.

■ **पादचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी काही उपाययोजना प्रस्तावित आहेत का ?**

गेल्या तीन वर्षांत ७११ पादचाऱ्यांचा अपघाती मृत्यू झाला आहे; तर, जखमींची संख्या त्याहून अधिक आहे. शहरात वाहनचालकांच्या तुलनेत पादचाऱ्यांची संख्या कितीतरी पटींनी अधिक आहे. त्यामुळे पादचाऱ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य आहेच. त्यांच्यासाठी पदपथ अतिक्रमण मुक्त करण्याची गरज असून, त्यात नागरिक, व्यापारी, महापालिका यांचे योगदान गरजेचे आहे. अतिक्रमण मुक्त पदपथांसाठी पोलिसांचे ‘हॉकर्स स्क्वाड’ पुन्हा कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यामार्फत रस्त्यावर किंवा पदपथावर अनधिकृतपणे पथारी मांडणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. रस्त्यांवर पहिला अधिकार पादचाऱ्यांचा आहे. परदेशात पादचारी रस्त्याकडे तोंड करून थांबतात. त्यातून संबंधिताला रस्ता ओलांडायचा असा संकेत वाहनचालकाला दिला जातो. पादचाऱ्याने संपूर्ण रस्ता ओलांडल्यानंतरच ते गाडी पुढे नेतात. हा ‘सेन्स’ आपल्याकडे येण्याची आवश्यकता आहे.

■ **आजची मुले हे उद्याचे वाहनचालक असणार आहेत. त्यांना वाहतुकीचे धडे देण्याबाबत आपण काय करत आहात?**

वाहतूक शाखेकडून शाळांमध्ये जाऊन वाहतूक नियमांबाबत विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले जात आहे. लहान मुलांनी दररोज त्यांच्या आई-वडिलांना ऑफिसला जाताना गाडी नीट चालवा, हेल्मेट घाला, सीट बेल्ट लावा, अशा सूचना कराव्यात, असे तेथे सांगितले जात आहे; तसेच, मोठे झाल्यावर वाहन चालविताना नियम पाळेन, अशी शपथही मुलांना दिली जाते. त्यातून भविष्यातील वाहनचालकांमध्ये किमान जागृती असेल, अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. शाळांमध्ये ‘आरएसपी’च्या माध्यमातूनही वाहतुकीच्या नियमांबाबत विद्यार्थ्यांना साक्षर केले जात आहे.

# ट्रैफिक पुलिस द्वारा शहर में 28 नये ऑटोरिक्शा स्टैंड निर्धारित

## रिक्शा ड्राइवरों से इन्हीं स्थानों का इस्तेमाल करने की अपील : ऑटोरिक्शा संख्या भी तय की गई

*पुणे, 1 जनवरी (आ.प्र.)*

शहर की ट्रैफिक समस्या हल करने के लिए ट्रैफिक विभाग ने फिर से आदेश जारी कर कुछ स्थानों के ऑटोरिक्शा स्टैंड में बदलाव किये हैं व कुछ स्थानों में नये ऑटो स्टैंड शुरू किये हैं.

शहर में इस तरह के 28 स्थान बनाये गये हैं तथा ऑटोरिक्शा ड्राइवरों से इन्हीं स्थानों का इस्तेमाल करने की अपील की है. इसके अलावा ऑटोरिक्शा स्टैंड व वहां पार्क किये जाने ऑटो की संख्या की जानकारी भी जारी की गई है.



■ ट्रैफिक समस्या हल करने के लिए ट्रैफिक विभाग ने फिर से आदेश जारी कर स्टैंड में बदलाव किये

**ऑटोरिक्शा स्टैंड व संख्या**

- दत्तवाड़ी- (सनसिटी रोड, सिंहगड पुलिस स्टेशन रोड, खाड़े वाशिंग चौक, सिंहगड रोड) ऑटोरिक्शा संख्या 10
- दत्तवाड़ी- (शिवसृष्टि सोसायटी के पास व अभिरुचि हल चौक के पास से बाईं ओर सनसिटी रोड, सिंहगड रोड) ऑटोरिक्शा संख्या- 5
- दत्तवाड़ी- (सन एम्पायर 5 सन इस्लाइट सिंहगड रोड- ऑटोरिक्शा) संख्या-5
- दत्तवाड़ी- (सनसिटी फेज-2, बस स्टॉप के पास, सोसायटी के बीच में सिंहगड रोड) ऑटोरिक्शा संख्या-5
- दत्तवाड़ी- (नांदेड सिटी गेट से 30 किलोमीटर फासले पर राजयोग सोसायटी चौक की ओर जाने वाले रोड पर) ऑटोरिक्शा संख्या-5
- हड़पसर- (हड़पसर रेलवे स्टेशन के सामने, शाहूनगर वसाहत से सटी दाहिनी दीवार के पास का परिसर) ऑटोरिक्शा संख्या- 10
- हड़पसर- (फुरसुंगी खंडकेरवा मंदिर के पास) ऑटोरिक्शा संख्या- 5
- हड़पसर- (सासवड-फुरसुंगी रोड, महावितरण कार्यालय के पास) ऑटोरिक्शा संख्या-5
- हड़पसर- (साईनाथ ऑटोरिक्शा स्टैंड, सासवड-फुरसुंगी रोड महावितरण कार्यालय के पास) ऑटोरिक्शा संख्या 5
- वारजे- (बराटे कॉलोनी के सामने वाला रोड, कर्वेनगर) ऑटोरिक्शा संख्या- 5
- वारजे- (गोल्डन पेटल्स के सामने वाला मेनरोड, ट्री हाउस स्कूल के पास) ऑटोरिक्शा संख्या- 5
- येरवड़ा- (गली नं. 8, कल्याणीनगर) ऑटोरिक्शा संख्या-5
- येरवड़ा- (वल्लभ ऑटोरिक्शा स्टैंड, गली नं. 7, कल्याणीनगर) ऑटोरिक्शा संख्या-5
- येरवड़ा- (गली नं. 6, कल्याणीनगर) ऑटोरिक्शा संख्या- 5
- येरवड़ा- (कल्याणीनगर कॉर्नर) ऑटोरिक्शा संख्या 5
- येरवड़ा- (कोणार्क स्लॅडर ऑटोरिक्शा स्टैंड, वडगांव शेरी) ऑटोरिक्शा संख्या- 5
- येरवड़ा- (शांतिनगर कॉर्नर, विश्रांतवाड़ी) ऑटोरिक्शा संख्या-5
- येरवड़ा- (समसाइन ऑटोरिक्शा स्टैंड, कल्याणीनगर) ऑटोरिक्शा संख्या- 5
- एयरपोर्ट- (नवनाथ ऑटोरिक्शा स्टैंड विमाननगर) ऑटोरिक्शा संख्या- 5
- एयरपोर्ट- (कोणार्क ऑटोरिक्शा स्टैंड विमाननगर) ऑटोरिक्शा संख्या- 5
- एयरपोर्ट- (धानोरी जकातनाका, लोहगांव रोड) ऑटोरिक्शा संख्या- 5
- एयरपोर्ट- (सिंबायोसिस विमाननगर न्यू कैम्पस विमाननगर के सामने वाला परिसर) ऑटोरिक्शा संख्या- 5
- एयरपोर्ट- (सिंबायोसिस कैम्पस, गेट नं. 4 की बगल में, रोड से सटा परिसर विमाननगर) ऑटोरिक्शा संख्या- 5
- एयरपोर्ट- (कालभैरवनाथ ऑटोरिक्शा स्टैंड, अशोक चौक खराड़ी बाइपास चौक) ऑटोरिक्शा संख्या- 5
- भारती विद्यापीठ- (लेक टाउन सोसायटी, गेट नं. 2, भारती विद्यापीठ) ऑटोरिक्शा संख्या- 10
- भारती विद्यापीठ- (व्यंकटेश्वरा हाईट्स के पास) ऑटोरिक्शा संख्या-5
- भारती विद्यापीठ- (लेक टाउन ऑटोरिक्शा स्टैंड कात्रज) ऑटोरिक्शा संख्या- 5
- सहकारनगर- (666 चैतन्य वसाहत के सामने, स्टेट बैंक कॉलोनी के पास बिबवेवाड़ी) ऑटोरिक्शा संख्या- 5

# तीन कोटींच्या अमली पदार्थांची केली होळी!

## वर्षभरात अमली पदार्थविरोधी पथकाची कामगिरी



नवनाथ शिंदे ■

पुणे : अमली पदार्थविरोधी पथकाच्या दमदार कामगिरीमुळे ड्रग माफियांनी धसका घेतला आहे. पोलिसांनी विविध कल्पत्या वापरून मागील वर्षभरात शहरातील विविध भागातून तब्बल ३ कोटी ८१ हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त करून १५७ जणांना जेरबंद केले. अमली पदार्थ विरोधी पथकाची मागील १० वर्षांच्या तुलनेत या वर्षभरातील सर्वात मोठी कारवाई आहे. पथकाच्या कामगिरीचा आलेख उंचावल्याने कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

गुन्हेगारीवर वचक ठेवण्यासह तरुणांना अमली पदार्थांपासून परावृत्त करण्यासाठी पुणे पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. त्यासाठी मागील वर्षभरात ड्रग माफियांचा ठावठिकाणा शोधून वठणीवर आणण्यासाठी पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थविरोधी पथकाच्या दोन टीम तयार केल्या होत्या. शहर ड्रग्जमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आल्यामुळे सर्वच पोलीस ठाण्यांतर्गत अमली पदार्थविरोधी पथक आणि स्थानिक पोलिसांना ड्रगमाफियांविरुद्ध सर्वाधिक कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले होते. त्यानुसार अमली पदार्थविरोधी पथक व स्थानिक पोलिसांनी २०१९ या वर्षभरात १११ गुन्हे दाखल दाखल केले.

त्यामध्ये १५७ आरोपींना अटक केली असून, तब्बल ३ कोटी ८१ हजारांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. ड्रग विक्री करणाऱ्यांमध्ये सर्वाधिक नायजेरिन ड्रगमाफियांचा समावेश आहे. मागील महिन्यात अमली पदार्थविरोधी पथकाने कोंढव्यातील एका इमारतीत छापा टाकून ८ नायजेरियना अटक करून १ कोटी रुपयांची ब्राऊन शुगर जप्त केली आहे. एकंदरीत अमली पदार्थविरोधी पथकाने वर्षभरात जप्त केलेल्या कारवाईमध्ये आरएमडी, गांजा, एलईडी पदार्थांचा समावेश आहे. अमली पदार्थविरोधी पथकाने २०१८ मध्ये ८७ गुन्हे दाखल करून ११८ जणांना अटक केली होती. त्यांच्याकडून १ कोटी १० लाखांचे अमली पदार्थ जप्त केले होते. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी तिपटीने अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

शहरातील तरुणांना नशेच्या खाईत लोटणाऱ्या ड्रगमाफियांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली. त्यामुळे २०१९ मध्ये मागील १० वर्षांतील सर्वाधिक मोठी कारवाई करून ३ कोटी ८१ हजारांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. अमली पदार्थविरोधी पथकातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या टीमवर्कमुळे कारवाईचा आलेख वाढला आहे. यापुढेही ड्रगमाफियांविरुद्ध कारवाई केली जाणार आहे.

■ डॉ. के. व्यंकटेशम, पोलीस आयुक्त

### मागील दहा वर्षांतील कारवाई

| वर्ष | दाखल गुन्हे | जेरबंद आरोपी | अमली पदार्थांची किंमत |
|---|---|---|---|
| २००९ | ७३ | १२४ | १ कोटी २० लाख |
| २०१० | ९२ | १४३ | ४८ लाख २० हजार |
| २०११ | ८६ | १०७ | ९६ लाख ६० हजार |
| २०१२ | ९४ | १३१ | ८४ लाख ५८ हजार |
| २०१३ | ६५ | ११४ | १ कोटी ६८ लाख |
| २०१४ | ६६ | ९७ | ६८ लाख ५५ हजार |
| २०१५ | ५४ | ९० | १ कोटी ३२ लाख |
| २०१६ | ६३ | ८० | २ कोटी २५ लाख |
| २०१७ | ७८ | १०६ | १ कोटी १० लाख |
| २०१८ | ८७ | ११८ | १ कोटी १० लाख |
| २०१९ | १११ | १५७ | ३ कोटी ८१ लाख |

लोकसत्ता – दि. २८ जानेवारी, २०२०

# प्रजासत्ताक दिन संचलनाचा मान महिला पोलिसांना

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** प्रजासत्ताक दिनानिमित्त शिवाजीनगर येथील पोलीस कवायत मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या शासकीय ध्वजारोहण सोहळ्यात पहिल्यांदाच शहर पोलीस दलातील महिला पोलिसांना संचलनाचा मान देण्यात आला.

पोलीस कवायत मैदानावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ध्वजवंदन केले. या प्रसंगी विभागीय आयुक्त डॉ. दीपक म्हैसेकर, जिल्हाधिकारी नवल किशोर राम, पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, पिंपरीचे पोलीस आयुक्त संदीप बिष्णोई, ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप पाटील आदी उपस्थित होते.



प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या संचलनाचा मान यंदा पहिल्यांदाच महिला पोलिसांना देण्यात आला. नवप्रविष्ट सहायक पोलीस अधीक्षक आंचल दलाल तसेच पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण यांनी संचलनाचे नेतृत्व केले. छाया गदिलवाड, ज्योती कुटे, सरला दसगुडे, माधुरी बिडवे, पूनम पाटील, मनीषा गिरी, सुरेखा शिंदे, स्नेहल जाधव, ऋतुजा मोहिते, सुप्रिया पंढरकर आदींनी संचलनात सहभागी झालेल्या तुकड्यांचे नेतृत्व केले. संचलनात ५८० महिला पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

प्रभात – दि. १६ जानेवारी, २०२०

# मांजा विकणाऱ्या ९७ दुकानांची झडती

## चिनी मांजाची माहिती देणाऱ्या नागरिकांना पोलीस देणार रोख बक्षीस

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १५** - पतंग उडवण्यासाठी बंदी असलेल्या चिनी मांजाच्या होणाऱ्या वापरामुळे पक्ष्यांसह माणसांच्याही जीवाला धोका असल्यामुळे पोलिसांकडून शहरातील पतंग व मांजा विक्री करणाऱ्या ९७ दुकानांची सोमवारी रात्री उशिरापर्यंत झाडाझडती घेतली. मात्र, त्यामध्ये धोकादायक चिनी, नायलॉन मांजा आढळला नाही. तरीही छुप्या पद्धतीने होणाऱ्या मांजा विक्री करणाऱ्यांची नागरिकांनी पोलिसांना माहिती दिल्यास, संबंधित व्यक्तीस पोलिसांकडून रोख रकमेचे बक्षीस मिळणार आहे.

मकर संक्रांतीनिमित्त शहरातील हौशी नागरिक, लहान मुलांकडून पतंग उडवण्यास प्राधान्य दिले जाते. काही जणांकडून मात्र पतंग उडवण्यासाठी चिनी, नायलॉन मांजाचा वापर होत असल्याच्या घटना मागील काही वर्षांपासून सुरू आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन शहरांमध्ये दोन तरुणींना मांजामुळे आपला जीव गमवावा लागला, तर अनेकजण जखमी झाले.



याबरोबरच हजारो पक्ष्यांनाही जीवाला मुकावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर मागील वर्षांपासून पुणे पोलिसांकडून चिनी मांजाविरुद्ध ठोस कारवाई करण्यावर भर दिला जात आहे.

पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या मार्गदर्शनानुसार, पोलिसांनी यावर्षीही चिनी मांजा विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. त्यासाठी पोलिसांनी गुन्हे शाखेची सात पथके तयार केली होती. या पथकासह शहरातील पोलीस ठाण्यांमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पतंग व मांजा विक्री करणारे ९७ दुकानांची झाडाझडती घेतली.

रविवार पेठेतील बोहरी आळी परिसरातील पतंग व मांजा विक्रीची दुकाने तपासण्यात आली. त्यामध्ये पोलिसांना बंदी असलेला मांजा आढळून आला नाही. मात्र, ही कारवाई सुरूच राहाणार असल्याचे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सांगितले. तसेच छुप्या पद्धतीने मांजा विक्री करणाऱ्यांची नावे नागरिकांकडून घेऊन संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे.

### नावे गुप्त ठेवणार

मांजा विक्री करणाऱ्यांची माहिती देणाऱ्या नागरिकांची नावे गुप्त ठेवली जाणार आहेत. तसेच संबंधित नागरिकांना एक हजार रुपयांचे रोख बक्षीस दिले जाणार असल्याचे पोलिसांनी जाहीर केले आहे. माहिती देण्यासाठी संपर्क क्रमांक : पोलीस नियंत्रण कक्ष : १०० किंवा ८९७५२८३१००, ८९७५९५३१००

“चिनी मांजाची विक्री होण्याची शक्यता लक्षात घेऊन ९७ दुकानांमध्ये छापे टाकले, मात्र तेथे मांजा आढळलेला नाही. यापुढेही कारवाई सुरु राहील. नागरिकांनी चिनी मांजाबाबत माहिती दिल्यास, त्यांना रोख बक्षीस दिले जाईल. तसेच विक्रेत्यावर कडक कारवाई होईल.

– अशोक मोराळे, अतिरिक्त पोलीस आयुक्त, गुन्हे

लोकमत – दि. १४ जानेवारी, २०२०

# वाहतूक नियमांच्या उल्लंघनाची नोंद

## चारित्र्य पडताळणीबाबत संजय शिंदे यांची माहिती : रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : नोकरीसाठी आवश्यक असणाऱ्या चारित्र्य पडताळणी अहवालामध्ये वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे संकेत अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे यांनी दिले. तसेच वाढत्या वाहनसंख्येमुळे वाहतुक धीम्या गतीने होते. हा वेग आणि सुरक्षितता वाढविण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीतर्फे आयोजित ३१ व्या रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. हे अभियान १७ जानेवारीपर्यंत सुरु राहणार आहे. जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप पाटील, महामार्ग पोलीस अधीक्षक मिलिंद मोहिते, प्रादेशिक परिवहन अधिकारी अजित शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी भगवान पवार, एसटी महामंडळाच्या पुणे विभाग नियंत्रक यामिनी जोशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. रस्ता सुरक्षाविषयक विविध फलक, पत्रक, पुस्तकांचे प्रकाशन यावेळी केले. तसेच विनाअपघात प्रवासी सेवा देणाऱ्या चालकांचा सत्कारही करण्यात आला.

अजित शिंदे यांनी प्रास्ताविक केले. अपघात हा रोग असून समृद्धीचे विकृत रुप आहे. त्यामुळे नागरिकांनी स्वयंशिस्त बाळगणे आवश्यक आहे. रस्ता सुरक्षा समिती ही शासन व नागरिक यांमधील दुवा असल्याचे त्यांनी नमूद केले. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी आभार मानले. आरती पटवर्धन यांनी सूत्रसंचालन केले.

> वाहनचालक संयम बाळगत नाहीत व सहकार्यही करत नाहीत. युवकांमधून तत्काळ बदल अपेक्षित आहे. अपघातांबाबत ब्लॅक स्पॉटची दुरुस्ती करुन घेण्यात येत आहे. रस्त्यावर लहान-लहान सुधारणा करुन मोठ्या दुर्घटना टाळता येतील. वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळून अपघात कमी होण्यासाठी प्रयत्न करावेत.
>
> – नवल किशोर राम, जिल्हाधिकारी, पुणे

### वाहन चालविताना संयम बाळगण्याचे आवाहन

- संजय शिंदे म्हणाले, 'वाहन चालविताना वाहनांची संपूर्ण माहिती असावी. डॅशबोर्डवर येणारी सर्व चिन्हे, आरसे आदींचा अभ्यासपूर्ण वापर करायला हवा. रस्त्यावर पादचाऱ्यांना प्रथम प्राधान्य देणे आवश्यक आहे.' अपघाताला आळा घालणे मोठे आव्हान असल्याचे पाटील यांनी सांगितले. वाहन चालकाविरुद्ध केवळ गुन्हे नोंदवून उपयोग नाही तर वाहन चालविताना वाहतुकीच्या नियमांचे पालने करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. मोहिते यांनी महामार्गावरील अपघातांबाबत माहिती देत वाहन चालविताना संयम बाळगण्याचे आवाहन केले.

# 8,677 दर्ज अपराधों में से 5,929 मामलों की सफल जांच : डॉ. वेंकटेशम

## पुलिस कमिश्नर द्वारा अपराधों का वार्षिक ब्यौरा देते हुए जांच में अच्छी कामयाबी का दावा

**पुणे, 8 जनवरी (आ.प्र.)**

पुलिस के बेहतर प्रयासों और उपायों से अपराध में कमी आ रही है. वर्ष 2018 के मुकाबले 2019 में अपराध के अधिकतर मामलों को हल करने में पुलिस को कामयाबी मिली है.

पुलिस मैक्सिमम केस को हल करने में सफल रही. यह दावा पुलिस कमिश्नर डॉ. के. वेंकटेशम ने साल भर के अपराध का ब्यौरा देने के लिए आयोजित प्रेस कॉन्फ्रेंस में किया. कुल 8, 677 मामलों में पुलिस 5, 929 मामलों में सफल जांच करके मामले को निपटाने में कामयाब रही. खासकर पिछले साल के मुकाबले अपराध में 879 की कमी आई है. हत्या के 74 मामलों में 71 मामलों को हल करने में पुलिस सफल रही. पुलिस द्वारा अपनाये गए तरीकों और लगातार किए जा रहे प्रयासों से अपराध में तो कमी आई है, लेकिन पुलिस अब भी चोरियों, हत्या के प्रयास, बलात्कार, छेड़छाड़, दंगे, लूटपाट, चेन स्नेचिंग और सेंधमारी के मामलों पर अंकुश लगा रही है.

फिर भी शहर में सेंधमारी, मोबाइल चोरी, बस यात्रियों से लूटपाट और सड़क पर होने वाले अपराध थमने का नाम नहीं ले रहे हैं. पिछले वर्ष अपराध की 8 हजार 677 घटनाएं घटीं. इनमें से 5 हजार 929 मामलों का खुलासा हुआ है. 2018 की तुलना में 2019 में अपराध पर काबू पाने का दावा पुणे पुलिस ने किया है. दूसरी तरफ 2018 की तुलना में पुलिस द्वारा किए गए उपायों से 879 घटनाएं कम हुई हैं, लेकिन वास्तविकता यह है कि 'स्ट्रीट क्राइम' कम नहीं हो रहे हैं.

पुणे शहर में घटने वाली घटनाओं को लेकर पुलिस आयुक्तालय द्वारा वार्षिक प्रेस कॉन्फ्रेंस का आयोजन किया गया था. इस मौके पर पुलिस कमिश्नर डॉ. के. वेंकटेशम ने क्राइम की वार्षिक जानकारी दी.

■ **कहा- पुलिस चोरियों, हत्या के प्रयास, बलात्कार, छेड़छाड़, दंगे, लूटपाट, चेन स्नेचिंग और सेंधमारी के मामलों पर अंकुश लगा रही**



इस दौरान ज्वाइंट पुलिस कमिश्नर डॉ. रवींद्र शिसवे, अपर पुलिस कमिश्नर अशोक मोराले, डॉ. संजय शिंदे, डीसीपी बच्चन सिंह उपस्थित थे. वर्ष 2019 में हुए हत्या, हत्या के प्रयास, गैर इरादतन हत्या जैसे मामले हल हो गए हैं. डकैती की तैयारी, बलात्कार, छेड़छाड़, ड्रग्स की बिक्री, जुआ, दंगा, ठगी, लूटपाट जैसे मामलों का पूरी तरह से समाधान हुआ है. प्रॉपर्टी से जुड़े मामलों का भी समाधान निकाला गया है. इनमें 40 फीसदी सेंधमारी, टू-व्हीलर चोरी पर विशेष रूप से ध्यान केंद्रित किया गया. यह जानकारी पुलिस कमिश्नर डॉ. के. वेंकटेशम ने दी है.

डॉ. वेंकटेशम ने कहा कि 2018 में विभिन्न पुलिस थानों के अंतर्गत 8 हजार 677 अपराध दर्ज किए गए. इनमें से 5 हजार 929 मामलों का खुलासा करने में सफलता मिली है. जबकि 2019 में क्राइम की संख्या 9 हजार 556 थी. इनमें पिछले वर्ष 879 की कमी आई.

■ **चोरियां बढ़ीं : जांच में भी कम सफलता मिली मगर हत्या के प्रयास, बलात्कार, छेड़छाड़, दंगे, लूटपाट, चेन स्नेचिंग व सेंधमारी पर अंकुश**

### विभिन्न पुलिस स्टेशनों में दर्ज अपराध के आंकड़े

| अपराध | संख्या | खुलासा |
|---|---|---|
| हत्या | 74 | 71 |
| हत्या का प्रयास | 121 | 120 |
| शारीरिक हिंसा | 1,245 | 1,225 |
| दंगा | 155 | 152 |
| व्यावसायिक प्रतिष्ठान में डाका | 3 | 2 |
| डाका डालने की तैयारी | 14 | 14 |
| लूटपाट | 221 | 174 |
| अन्य लूटपाट | 157 | 132 |
| सभी तरह की चोरी | 3,045 | 1,045 |
| चेन चोरी | 64 | 42 |
| वाहनचोरी | 1,678 | 546 |
| दिन में सेंधमारी | 108 | 64 |
| रात में सेंधमारी | 352 | 193 |

पिछले वर्ष की तुलना में शहर में अपराध में 9 प्रतिशत की कमी आई है. जबकि 2018 में 1 हजार 966 वाहनों की चोरी हुई थी. इसकी तुलना में इस बार वाहन चोरी की घटना में 290 की कमी आई है. वाहन चोरी की घटनाओं को रोकने के लिए जिस क्षेत्र से वाहन चोरी होती है. ऐसे संबंधित जगहों पर संबंधित विभाग की पुलिस को नजर रखने के निर्देश दिए गए हैं. पीएमपीएमएल बस स्टैंड व एसटी बस स्टैंड के चोरों को पकड़ने के लिए विशेष ध्यान दिया जा रहा है.

लोकमत – दि. ९ जानेवारी, २०२०

# लेकी गेल्या चोरी, लेक गेले घारी, परदेशी म्हातारी घरात

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे यांचे मत : भरोसा सेलचा वर्धापन दिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपण केलेले चांगले काम चांगल्या प्रकारे केल्याने ते जास्त समाधानकारक होते. माणूस म्हणून निर्भयपणे जगू शकतो, असा भरवसा पुणे पोलिसांकडून देण्यात येत आहे. समाजाच्या दृष्टीने ही निश्चितच चांगली बाब आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे यांनी बुधवारी व्यक्त केले.

भरोसा सेलकडून होणाऱ्या कामाची प्रशंसा करताना त्यांनी एक ओवी सांगितली. 'लेकी गेल्या चोरी, लेक गेले घारी, परदेशी म्हातारी घरात' म्हणजे जावई मुली चोरून नेतात, सुना घारीसारख्या येऊन मुलांना चोरून नेतात, त्याचा परिणाम त्या घरातील वृद्ध आई-वडील एकटे पडतात, अशी जात्यावरील ओवीची आठवण त्यांनी सांगितली. अशा घरात एकट्या राहिलेल्या आई-वडिलांना मदतीचा हात भरोसा सेलमाध्यमातून दिला जातो. हे काम कौतुकास्पद आहे, असे डॉ. ढेरे यांनी सांगितले.

पुणे पोलिसांकडून महिला, बालक व ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींच्या निराकरणासाठी भरोसा कक्ष सुरू केला. या कक्षाचा पहिला वर्धापन दिन बुधवारी झाला. कबड्डीपटू दीपिका जोसेफ, पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम्, सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, वरिष्ठ पोलीस अधिकारी प्रदीप देशपांडे, अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे उपस्थित होते. एसएनडीटी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या कुलकर्णी यांनी भरोसा कक्षाच्या कामकाजावर आधारित लिहिलेल्या 'इम्पॅक्ट ॲसेसमेंट ऑफ भरोसा सेल' पुस्तकाचे प्रकाशन केले.



'भरोसा' सेलच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रात्यक्षिक करताना पोलीस कर्मचारी.

भरोसा सेलच्या माध्यमातून सामान्यांना आधार मिळतो. काम करताना अनेक अडचणी येतात. सामान्यांना न्याय देण्याचे काम या सेलच्या माध्यमातून केले जात आहे. त्यातून मिळणारे समाधान वेगळे असल्याचे डॉ. वेंकटेशम् यांनी सांगितले. जोसेफ यांनी मनोगत व्यक्त केले. भरोसा कक्षातील ॲड. प्रार्थना सदावर्ते यांनी त्यांचे अनुभव सांगितले. विजय जगताप, सुलोचना बनसोडे यांनी प्रातिनिधिक स्वरूपात त्यांचे मत मांडले. गेल्या वर्षभरात महिला साह्य कक्षात ३ हजार ९९ अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी २,२४८ तक्रारींचे निराकरण करण्यात आले. ८५१ तक्रारींचे निराकरण करण्याचे काम सुरू आहे. ज्येष्ठ नागरिक कक्षात ६१७ तक्रार अर्ज दाखल झाले, त्यापैकी ५६२ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून, ५५ तक्रारींचे निराकरण करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. विशेष बाल पथकाच्या माध्यमातून २ हजार ६९३ अल्पवयीन मुलांचे समुपदेशन करण्यात आले आहे.

भरोसा कक्षाचे कामकाज अतिरिक्त आयुक्त मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, सहायक आयुक्त विजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला साह्य कक्षाच्या पोलीस निरीक्षक विजया कारंडे, विशेष बाल सुरक्षा पथकातील पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण, ज्येष्ठ नागरिक कक्षाच्या पोलीस निरीक्षक वैशाली चांदगुडे कामकाज पाहत आहेत.

पुढारी – दि. १० जानेवारी, २०२०

# शहरातील ४२ सिग्नलला बॅकअप सिस्टिम



**पुणे : प्रतिनिधी**

शहरातील वाहतुकीला नियंत्रित ठेवण्याचे काम विविध चौकातील सिग्नल करतात. मात्र अचानक वीज प्रवाह खंडित झाल्यानंतर ही यंत्रणा बंद पडते आणि चौकातील वाहतूक पोलिसांवर वाहतूक नियंत्रित करण्याचा ताण पडतो. यावर उपाय म्हणून चौकातील सिग्नलला बॅटरी इन्व्हर्टर जोडण्याचे काम महापालिका प्रशासनाने हाती घेतले आहे. आत्तापर्यंत शहरातील महत्त्वाच्या ४२ चौकांमधील सिग्नलला ही बॅकअप सिस्टिम जोडण्यात आली आहे.

शहरातील वाहतूक नियंत्रणासाठी महापालिका प्रशासनाकडून शहरातील लहान मोठ्या चौकांमध्ये वाहतूक नियंत्रण कक्ष (सिग्नल) बसविले जातात. शहरातील जवळपास २४२ चौकांमध्ये पालिकेने सिग्नल बसविले आहेत. या सिग्नलचा वेळ त्या-त्या परिसरातील वाहतूक पोलिसांच्या सल्ल्यानुसार कमी-जास्त ठेवला जातो.

सर्व सिग्नलची देखभाल दुरूस्ती पालिकेकडून केली जाते. अनेकवेळा वीज प्रवाह खंडित होणे, वीज वाहिनी तुटणे, यांसह विविध कारणांमुळे चौकांमधील सिग्नल बंद पडतात. त्यामुळे चौकामध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. असा वेळी चौकाची जबाबदारी दिलेल्या वाहतूक पोलिस कर्मचाऱ्याची मोठी तारांबळ उडते. शिवाय वाहतूक कोंडीचा फटका वाहन चालकासोबत नागरिकांनाही बसतो. या पार्श्वभूमीवर पालिकेच्या विविध इमारतींमधून जवळील चौकांमधील सिग्नलला वीज जोडणी करून इमारतीमधील जनरेटर, बॅटरी बॅकअप याचा वापर सिग्नलसाठी करण्याची संकल्पना पुढे आली होती.

त्यानुसार पालिकेच्या विद्युत विभागाने वाहतूक पोलिसांच्या सल्ल्यानुसार एकून ४२ चौकातील सिग्नलला जनरेटर, बॅटरी बॅकअप जोडण्यात आल्याची माहिती विद्युत विभागाचे प्रमुख श्रीनिवास कंदुल यांनी दिली आहे. यासाठी दहा लाख रुपये खर्च करण्यात आला. वीज गेल्यानंतर किमान ४ तास जनरेटर, बॅटरी बॅकअपवर सिग्नल व्यवस्था सुरू राहू शकते. हे काम केलेली कंपनी या व्यवस्थेची तीन वर्षे देखभाल दुरुस्ती करणार असल्याचे कंदुल यांनी सांगितले आहे.

### या ठिकाणी आहेत सिग्नल...

शहरातील बालगंधर्व चौक, बोपोडी चौक, अंडी उबवणी केंद्र, संचेती चौक, सिमला ऑफिस चौक, कात्रज डेअरी चौक, खंडूजीबाबा चौक, स्वारगेट जेधे चौक, सेवन लव्हज चौक, बुधवार चौक, आठवले चौक, वडगांव पूल, वारजे पूल, वनदेवी चौक, रसशाळा चौक, रेंजहिल्स चौक, गोखले (गुडलक) चौक, पुरम चौक, पंचमी हॉटल चौक, टिळक चौक, दांडेकर पूल चौक, विमाननगर चौक, शास्त्रीनगर चौक, गुंजन थिएटर चौक, गोल्फ क्लब चौक, सादलबाबा चौक, चंद्रलोक हॉस्पिटल चौक, पुष्पमंगल चौक, शारदा आर्केड चौक, कात्रज बाइपास, ज्योती होटल चौक, लुल्लानगर चौक, खराडी बायपास चौक, खराडी दरगाह चौक, केशवनगर चौक, मंतरवाडी फाटा चौक, वैदुवाडी चौक, रामटेकडी चौक, फातिमानगर चौक, भैरोबानाला चौक, शाहीर अमर शेख चौक व मालधक्का चौक आदी ठिकाणी ही व्यवस्था करण्यात आली आहे.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ३० जानेवारी, २०२०

# गुन्हेगारीच्या वाटेला स्वयंरोजगाराचे वळण

## विधिसंघर्षित बालकांना दिले जाते व्यावसायिक प्रशिक्षण

Shrikrishna.Kolhe
@timesgroup.com
Tweet : @ShrikrishnaMT

मटा विशेष

**पुणे :** 'विधिसंघर्षित बालकां'ना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पुणे पोलिसांनी एक अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. पोलिसांनी अशा बालकांना शिक्षणासोबतच स्वयंरोजगाराचे धडे देण्यास सुरुवात केली आहे. या निर्णयामुळे अजाणत्या वयात हातून घडलेल्या गुन्ह्यातून माथ्यावर बसलेला 'बालगुन्हेगारा'चा शिक्का पुसण्यासाठी अशा बालकांना मदत होणार आहे.

सध्या २३ 'विधिसंघर्षित बालके' स्वयंरोजगाराचे धडे घेत असून, त्यांनी तयार केलेले विविध 'प्रकल्प' कौतुकास पात्र ठरले आहेत.

पुणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत २०१९मध्ये विविध गुन्ह्यांमध्ये ६०५ विधिसंघर्षित बालकांचा सहभाग असल्याचे आढळून आले आहे. कधी पोटाची भूक भागविण्यासाठी, कधी मित्रांबरोबर चित्रपट पाहण्यासाठी, तर कधी हालाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे अनेक जण लहान वयात गुन्हेगारीकडे वळतात. पुण्यात दर वर्षी बालगुन्हेगारांची संख्या वाढत असल्याने पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी 'भरोसा सेल'मध्ये विशेष बालसुरक्षा पथक तयार केले. यामध्ये प्रत्येक पोलिस ठाण्यातून विधिसंघर्षित बालकांची माहिती घेऊन त्यांचे समुपदेशन केले जाते. गेल्या वर्षात ११६ वेळा पोलिस ठाण्यात जाऊन बैठका घेऊन त्याद्वारे १२३३ मुलांचे समुपदेशन करण्यात आले आहे. या बालकांना गुन्हेगारी, व्यसनांपासून परावृत्त करून समाजाच्या मुख्य प्रवाहात आण्यासाठी प्रयत्न केले जात असून, व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षणदेखील दिले जात आहे. सध्या युनिक स्किल डेव्हलपमेंट सेंटर व कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या मदतीने २३ विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराचे धडे दिले जात आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, मोबाइल दुरुस्ती, वाहनदुरुस्ती, फॅशन डिझायनिंग आदींचा समावेश आहे, अशी माहिती बालसुरक्षा सेलच्या प्रमुख शिल्पा चव्हाण यांनी दिली.

### 'त्यांच्या' निर्मितीचे होतेय कौतुक

डेक्कन पोलिस ठाण्यात मारामारीचा गुन्हा दाखल असलेल्या एका विधिसंघर्षित बालकाने 'वॉटर सप्लायर सेन्सर' तयार केले आहे. युनिक स्किल डेव्हलपमेंट सेंटरने भरवलेल्या प्रदर्शनात त्याचा प्रोजेक्ट कौतुकाचा विषय ठरला होता. तर, सहकारनगर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल असलेल्या एका तरुणाने 'मोबाइल डोअर लॉक' तयार केले आहे. आणखी एका चोरीच्या गुन्ह्यातील मुलाने 'बबल मेकिंग मशिन' तयार केले आहे. तीन विधिसंघर्षित बालकांनी ऑटोमोबाइलचे प्रशिक्षण पूर्ण केले असून, ते नोकरीच्या शोधात आहेत.

> प्रत्येक पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील विधिसंघर्षित बालके 'भरोसा सेल'मधील बालसुरक्षा पथकाकडून शोधून काढली जातात. त्यांना विविध स्वयंसेवी संस्थाच्या मदतीने व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.
>
> – अशोक मोराळे,
> अतिरिक्त पोलिस आयुक्त, गुन्हे शाखा

PuneMirror - 16 January, 2019

# Pune partied responsibly to usher in the New Year

## Compared to previous years, cases of drunk driving came down by more than half

Supriya.Dedgaonkar
@timesgroup.com
TWEETS @supriya_mirror

Punekars who were out there in clubs, hotels and resorts to enjoy New Year's Eve behaved much better than previous years when it came to drunk driving.

Compared to previous New Year's Eve where around 950 people were booked for drunk driving, the number of cases reduced by more than half with only 460 people being caught for the offence.

There were at least 600 cops deployed all over Pune Municipal Corporation's (PMC) jurisdiction limits at all the major junctions on Tuesday night, not just to book offenders but also ensure people's safety.

Most drunk and drive cases were reported in Koregaon Park, Camp, Warje and Swargate.

Police commissioner K Venkatesham said, "We are elated that Punekars abided by the mantra of not drunk driving on the New Year's Eve. Several outreach programmes conducted by us over the month and the intensified drives against drunk driving has helped. Social media and several other media like print and television have also helped in achieving the numbers."




460 cases of drunk driving were recorded

"Also, on this New Year's Eve, not a single abnormal incident or accident took place and that is quite an achievement for everyone in the city," he added.

Prajakte Bhave, a party goer, chose to hire a cab instead of driving herself back home this time. She said, "With all Ola and Uber cabs being available at the tip of your finger, it is so much easier to do that. I usually wrap up my party and leave early, but this year I thought I will enjoy to the fullest and then hire a cab back home. The bandobast seemed to be managed very well and Koregaon Park, the party hub of the city, was much at peace this time."

Another such person, Janhavee Khanvilkar, said, "One of my friends was caught in one of the bandobasts on Sunday night and that's when we all decided to take a cab back home, rather than driving ourselves and that worked for us. We wanted to be safe than sorry."

Atul Navgire, police inspector of Swargate police station, said, "Every year, we book hundreds of teenagers for drunk driving, this year the situation was much better. We did not come across many such young people and it was a relief that people are finally listening and following the rules."

सकाळ – दि. १० जानेवारी, २०२०

# गुन्ह्यांतील ऐवज मध्यवर्ती कक्षात

पांडुरंग सरोदे :
@spandurangSakal

पुणे, ता. ९ : गुन्ह्यांत जप्त केलेली हत्यारे, नोटा, कपडे यांसह अन्य वस्तू ठेवण्यासाठी पोलिस ठाण्यांतील अडगळीच्या खोलीचा मुद्देमाल कक्ष म्हणून वापर केला जात असे. तेथील कोंदट, दुर्गंधीयुक्त वातावरणातच 'ड्यूटी'वरील पोलिस कर्मचाऱ्याला दिवस काढावे लागत होते; परंतु आता हे चित्र बदलले आहे. पोलिस ठाण्यांनी मोकळा श्वास घेतला आहे, तो शहर पातळीवर मुद्देमाल ठेवण्यासाठी तयार केलेल्या अद्ययावत मध्यवर्ती मुद्देमाल कक्षामुळे!

वेगवेगळ्या गुन्ह्यांत जप्त केलेल्या वस्तू ठेवण्यासाठी प्रत्येक पोलिस ठाण्यांमध्ये मुद्देमाल कक्ष वर्षानुवर्षे कार्यरत आहेत. बहुतांश प्रकरणांना न्यायालयीन प्रक्रियेमुळे विलंब होत असल्याने त्या-त्या प्रकरणांशी संबंधित मुद्देमाल या कक्षामध्ये वर्षानुवर्षे पडून राहात होता. खुनासारख्या प्रकरणातील कपडे, हत्यारे, चलनातील नोटा, कागदपत्रे खराब होऊन त्याची दुर्गंधी सुटत असे. अनेकदा त्याच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असे.

कक्षावरील कर्मचाऱ्याच्या आरोग्यावरही त्याचा परिणाम होत असे. याबरोबरच या कक्षातून महागड्या वस्तू, चलनातील नोटांना पाय फुटण्याचे प्रकारही अनेकदा घडले आहेत.

## अद्ययावत कक्षामुळे झालेले फायदे

- पुराव्यांचे मूल्य कायम ठेवण्यास उपयुक्त
- पोलिस ठाण्यातील वातावरण स्वच्छ राहण्यास मदत
- जपणूक करण्यावर अधिक भर
- मुद्देमाल न्यायालयात नेण्याची प्रक्रिया सुलभ
- चोरीला जाण्याच्या प्रकारांना आळा



शिवाजीनगर : मध्यवर्ती मुद्देमाल कक्ष.

दरम्यान, पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनी या काही पोलिस ठाण्यांना भेटी देऊन तेथील मुद्देमाल कक्षांची पाहणी केली होती. त्यानंतर त्यांनी मध्यवर्ती मुद्देमाल कक्ष निर्मितीची संकल्पना मांडली होती. त्यानुसार, पोलिस प्रशासनाने त्याची गांभीर्याने दखल घेऊन शिवाजीनगर येथे स्वतंत्र व अद्ययावत मध्यवर्ती मुद्देमाल कक्षाची काही महिन्यांपूर्वी निर्मिती केली. तेथे शहरातील ३० पोलिस ठाण्यांमधील मुद्देमाल ठेवला जात आहे. विशेषतः मुद्देमाल सांभाळण्याचा ताण कमी झाल्यामुळे पोलिस अधिकारी व कर्मचारीही आता निश्चिंत झाले आहेत. पोलिस ठाण्यांना न्यायालयीन कामकाजासाठी लागणारे पुरावे मध्यवर्ती कक्षाकडे मागितले जातात. सर्व पोलिस ठाण्यांचे स्वतंत्र कक्ष करून संबंधित पुराव्यांना कोडिंग, डिकोडिंग करण्यात येते. त्यामुळे काही क्षणातच पुरावे तपास अधिकाऱ्याला प्राप्त होतात. न्यायालयीन कामकाज पूर्ण झाल्यानंतर संबंधित मुद्देमाल पुन्हा तेथे जमा केला जातो.

**या कक्षामुळे पोलिस ठाण्यांवरील ताण कमी झाला. मध्यवर्ती केंद्रामुळे काही क्षणातच पुरावे मिळण्यास मदत होते. तसेच न्यायालयीन कामासाठीचे पुराव्यांचे मूल्य अबाधित राहण्यास मदत झाली.**
**- अशोक मोराळे,**
अतिरिक्त पोलिस आयुक्त (गुन्हे)

**महाराष्ट्र टाइम्स – दि. १५ जानेवारी, २०२०**



पतंगांसाठी बंदी असलेल्या चिनी व नायलॉन मांज्याचा वापर केल्याने अनेक दुर्घटना घडल्या आहेत. याबाबत जनजागृती करण्यासाठी रमणबाग शाळेत विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. या वेळी मानवी रचनेतून रंगीबेरंगी पतंगाचा आकार विद्यार्थ्यांनी साकारला.

# मांज्याची माहिती दिल्यास बक्षीस

## पुणे शहर पोलिसांचा उपक्रम; चिनी मांज्याची विक्री करणाऱ्यांवर कारवाई

म. टा. प्रतिनिधी, पुणे

> बंदी असलेल्या मांज्याची विक्री करणाऱ्यांची माहिती देणाऱ्या नागरिकांना एक हजार रुपयांचे रोख बक्षीस दिले जाणार आहे. माहिती देणाऱ्यांची नावे गुप्त ठेवली जाणार आहेत. नागरिकांनी माहिती देण्यासाठी १००, ८९७५२८३१०० किंवा ८९७५९५३१०० या क्रमांकावर संपर्क साधावा.
>
> – अशोक मोराळे, अतिरिक्त पोलिस आयुक्त, गुन्हे

बंदी असलेल्या चिनी मांज्याचा पतंग उडविण्यासाठी सर्रास होणारा वापर पाहता मांजाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला आहे. गेल्या दोन दिवसांपासून पोलिसांनी शहरातील पतंग व मांजा विक्री करणाऱ्या १७ दुकानांची तपासणी केली. चोरून चिनी मांज्याची विक्री करणाऱ्यांची माहिती मिळावी यासाठी आता पोलिसांनी बक्षीस योजना सुरू केली आहे. जे नागरिक अशा दुकानदारांची माहिती देतील, त्यांना पोलिसांकडून रोख रकमेचे बक्षीस दिले जाणार आहेत.

पतंग उडविण्यासाठी चिनी मांज्याच्या होणाऱ्या वापरामुळे पक्षांसह माणसांच्याही जीवाला धोका निर्माण होतो. मकर संक्रातीचे औचित्य साधून शहरातील अनेक भागांत हौशी नागरिक, लहान मुले पतंग उडवतात. मात्र, काही नागरिक पतंग उडविण्यासाठी चिनी, नायलॉन मांज्याचा वापर करीत असल्याच्या घटना गेल्या काही वर्षांपासून सुरू आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोन तरुणींना मांजामुळे आपला जीव गमवावा लागला, तर अनेकजण जखमी झाले. यासह हजारो पक्षांनाही चिनी मांज्यामुळे आपल्या जीवाला मुकावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या काही वर्षांपासून पुणे पोलिसांनी चिनी मांज्याची विक्री करणाऱ्यांवर ठोस कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. पोलिसांनी चिनी मांज्यावर बंदी घातलेली असतानाही शहरातील मध्यवर्ती भागांत सर्रासपणे चिनी मांज्याची विक्री होत असून, या विक्रेत्यांवर पालिका प्रशासन कारवाई करीत नसल्याचे वृत्त 'महाराष्ट्र टाइम्स' ने दोन दिवसांपूर्वी दिले होते.

चिनी मांज्याच्या विक्रीला बंदी असतानाही त्यावर पालिका प्रशासनाच्या वतीने कारवाई केली जात नसल्याचे स्पष्ट झाल्याने आता पोलिसांनी यामध्ये सहभाग घेऊन कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांच्या आदेशावरून कारवाई केली जात आहे. यासाठी पोलिसांनी गुन्हे शाखेची सात पथके तयार केली आहेत. या पथकासह शहरातील पोलिस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गेल्या दोन दिवसांत पतंग व मांजा विक्री करणाऱ्या १७ दुकानांची तपासणी केली. रविवार पेठेतील बोहरी आळी परिसरातील पतंग व मांजा विक्रीची दुकाने यामध्ये तपासण्यात आली. ही कारवाई यापुढील काळात सुरूच राहणार असल्याचे गुन्हे शाखेच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. छुप्या पद्धतीने मांजा विक्री करणाऱ्यांची नावे नागरिकांनी द्यावीत यासाठी बक्षीस योजनाही पोलिसांनी सुरू केली असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

---

**Pune Mirror - 26 January, 2019**

# Soon, 5 chowks in the city will be watched only by CCTV, no cops

## After pilot, aim is to implement this initiative at around 50 junctions

Supriya.Dedgaonkar@timesgroup.com

TWEET @supriya_mirror

In a first for the city, five of its chowks are soon to be designated for a project wherein traffic offenders will be nabbed solely by using closed-circuit television (CCTV) camera surveillance, leaving the junction physically cop-free. The initiative will take off in March 2020 on a pilot basis, and the aim is to them implement it across the city.

A total of Rs 1.25 crore is going to be spent on this through Member of Parliament (MP) funds. The 360-degree rotating cameras used will provide high picture quality and be accompanied by hi-tech sensors.

Some 20 sensors and cameras are to be fitted at major chowks like Swargate, Deccan, University Road, Viman Nagar and Bund Garden Road; they are to ensure culprits are nabbed immediately after a traffic violation like signal jumping, halting on zebra crossing or no-helmet riding.

This idea was first proposed by commissioner of police K Venkatesham, and is likely to be carried out eventually at 50 chowks in the city. Although the cameras will replace cops in the job of nabbing and fining rule violators, police will continue to manage the traffic manually. Venkatesham told *Mirror*, "Apart from a few Asian countries, nowhere else in the world will you see traffic police physically present at all junctions to govern them. It is also because citizens there are more cautious while on the roads, be it on two- or four-wheelers. A few months ago, we decided in a meeting that traffic cops deployed at 50-odd junctions of the city at present will be asked to vacate and these chowks will then entirely looked after via CCTV surveillance."

He added, "It is also essential that Punekars become responsible about road rules in the absence of police, and not just follow them in the fear of being fined by a cop if present. When anyone applies for a learner's or permanent licence, it is expected that s/he is aware of traffic norms and will follow them."

सकाळ – दि. २ जानेवारी, २०२०

# पोलिसांकडून 'डिजिटल चार्जशीट'

पांडुरंग सरोदे @spandurangSakal

पुणे, ता. १ : गुन्ह्याचे दोषारोपपत्र (चार्जशीट) डिजिटल स्वरूपात न्यायालयात सादर करीत पुणे पोलिसांनी आपणही 'स्मार्ट' होत असल्याचे दाखवून दिले आहे. आतापर्यंत विविध गुन्ह्यांचे सव्वाशेहून अधिक 'डिजिटल चार्जशीट' तयार करीत पोलिसांनी तंत्रज्ञानाचा हात धरला आहे.

पोलिस ठाण्यांमध्ये प्रवेश केल्यानंतर एखाद्या खोलीच्या कोपऱ्यामध्ये दोषारोपपत्रांच्या कागदांचे डोंगर उभे राहिलेले दिसतात. ते वर्षानुवर्षे धूळ खात पडलेले असतात. हे कागदांचे डोंगर पोलिस ठाण्यातून न्यायालयात किंवा एका शहरातून दुसऱ्या शहरात नेताना कर्मचाऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडते.

पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनी 'डिजिटल चार्जशीट' ही संकल्पना वरिष्ठ पोलिस



अधिकाऱ्यांसमोर मांडली. 'डिजिटल चार्जशीट'मुळे होणारे फायदेही त्यांना समजून सांगितले. पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांनी ही संकल्पना राबविण्याचे ठरविले. त्यानुसार, संबंधित परिमंडळाच्या हद्दीत घडलेल्या वेगवेगळ्या ११७ गुन्ह्यांचे त्यांनी 'डिजिटल चार्जशीट' करण्यास प्राधान्य दिले.

**'स्मार्ट वर्क'च्या दिशेने...**

पुणे पोलिसांकडून शहरातील वाहतूक, पोलिस ठाणे, गुन्हे शाखा, विशेष शाखा, सीसीटीव्ही अशा वेगवेगळ्या विभागांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञान वापरास प्राधान्य दिले आहे. त्यानुसार विविध प्रकारच्या वेबसाइट, वेबपेज, मोबाईल अ‍ॅप्लिकेशन्सचा वापर करून ई-चलनपासून पासपोर्टपर्यंत अनेक गोष्टींत तंत्रज्ञान आणले. त्यातूनच डॉ. वेंकटेशम यांनी 'डिजिटल चार्जशीट' संकल्पना पुढे आणली. लवकरच त्याचा सर्रास वापर होण्याची शक्यता आहे.

## 'डिजिटल चार्जशीट'चे फायदे

- समन्स/वॉरंट बजाविण्यासाठी उपयुक्त
- पेन ड्राइव्हमधून कुठेही सहज नेता येते
- गुन्ह्याबाबतची माहिती एका क्लिकवर मिळते
- पोलिसांचे कष्ट, वेळ व पैसे वाचण्यास मदत होते
- कागदाची बचत होऊन पर्यावरणसंरक्षणास हातभार लागतो
- पोलिसांवरील नाहक ताण कमी होण्यास मदत होते

**डिजिटल चार्जशीटमुळे पोलिसांच्या कामात पारदर्शकपणा व गुणवत्ता दिसू लागली आहे. गुन्ह्याच्या तपासामध्ये गती येत असून, भविष्यात याच पद्धतीचा सर्वाधिक अवलंब केला जाईल.**
**– अशोक मोराळे,** अपर पोलिस आयुक्त (गुन्हे)

**डिजिटल चार्जशीट कित्येक वर्षे टिकू शकते. ते सहजसोप्या पद्धतीने उपलब्ध होऊन वर्षानुवर्षे प्रलंबित प्रकरणेही तत्काळ मार्गी लागू शकतात. पोलिसांवरील ताण कमी होण्याबरोबरच कागदाचा वापर होत नसल्याने पर्यावरणाचे रक्षणही होऊ शकते.**
**– सुहास बावचे,** पोलिस उपायुक्त, परिमंडळ पाच

**PuneMirror - 11 January, 2019**

# More 'bharosa' on arranged marriages: SNDT profs' study




City cops shared that 80% of cases before the Bharosa Cell are couples in arranged marriages, love marriages are 15% and live-ins are 5%

## Basing its conclusions on data of Pune police's Bharosa Cell, research claims that couples in such unions are more committed to resolving their issues than those in love marriages


Supriya.Dedgaonkar@timesgroup.com
TWEET @supriya_mirror


Based on their study of data shared by the Bharosa Cell of Pune police, two professors at Shreemati Nathibai Damodar Thackersey (SNDT) Women's University have found that couples who were brought together by an arranged marriage are more keen to keep it together against all odds, as compared to those who chose their partners of their own volition.

They've drawn this conclusion from the fact that 80 per cent of the cases before the cell are of couples who tied the knot at the behest of their family and friends. On the other hand, the number of cases of those who married people of their personal choice (love marriage as it is called in the subcontinent, where the other format is a more accepted practice) was merely 15 per cent. As for those who've chosen to live together without the formality of wedlock, they accounted for a marginal five per cent of the cases handled by Bharosa Cell.

The two psychology faculty members, Dr Madhuri Kulkarni and Dr Manasee Rajhans have read this as an indication that those in an arranged union have a willingness to give each other many chances and think in terms of long-term commitment, unlike their counterparts who broke social traditions in choosing their spouse. This comes after sifting through updates shared by Bharosa Cell over three months and doing an impact assessment of its work.


CONTINUED ON PAGE 5 »


> An arranged marriage is more likely to sustain as parents and relatives intervene to ensure that. In the other cases, the parents may already be averse to the relationship and offer no support when things start coming apart
> —Smita Joshi, marriage counselor

Elaborating on the endeavour, Dr Kulkarni, who is also the vice principal of SNDT, insisted, "The fact that there are more cases of those conflicted in an arranged marriage here is not because they are the ones having more issues, rather they are the ones who are willing to settle the issues. Talking to them and assessing the cases, we realised that they are here for a resolution. In other romantic set-ups, the couples rarely seek help, preferring to knock directly at the doors of the court and pursue drastic outcomes such as separation or divorce."

She was also very appreciative of the role being played by the Bharosa Cell as a mediator between the couples. "As in the past when families from both sides stepped in to find a middle path and a solution no matter how bad the situation, the cell perseveres with its intervention. It also calls in the families of the couples, involving them in the counselling. Instead of giving opportunity for any blame game, as a strategy the counsellors harp on the positive factors to assuage the equation between the duo," she commended.


A woman, who sought and got a resolution to her marriage through the Bharosa Cell, shared, "We were married seven years ago and also have child. In the past two years we've been getting into spats which began with small issues but soon escalated to critical ones. We didn't wish to separate but staying together was becoming difficult. Having heard of the Bharosa Cell from a cop friend of mine, I felt these people would not have any vested interest. Within a few sessions of counselling, we found our minds cleared and were pushed into thinking of the positive aspects of the marriage."

When questioned on the social factors at play which would ensure that couples, who allowed their marriage to be fixed by others in keeping with tradition, would inevitably be more hesitant to go against socially accepted practices and break up, Dr Kulkarni argued, "Agreeing to an arranged marriage is no longer an act of conservatism. These days, people are more focused on their careers and life goals and prefer their parents to choose their partners while they continue to concentrate on other aspects of life."

The Bharosa Cell offers its services free of charge, though it deploys a team of police personnel, lawyers and psychologists for the exercise. Clearly pleased with the performance of the special unit, commissioner of police K Venkatesham pointed out, "Every case that comes before Bharosa Cell is addressed very seriously. All efforts are made to ensure the case is closed on a positive note." He, however, attributed the higher number of cases being of those in arranged marriage to the continued larger preference for the accepted social practice of such unions.

Offering yet another perspective on the data, city-based marriage counsellor, Smita Joshi pointed out, "For any marriage to be successful, it is essential for both sets of parents to be supportive. An arranged marriage is more likely to sustain as parents and relatives intervene to ensure that. In the other cases, the parents may already be averse to the relationship and offer no support when things start coming apart. We've seen a similar trend in the family courts, of arranged marriages having a better chance of survival."

**प्रभात – दि. २८ जानेवारी, २०२०**



# वर्षभरात २५ चौकांत थ्री-डी झेब्रा क्रॉसिंग होणार


प्रभात वृत्तसेवा


**पुणे, दि. २७ -** शहरामध्ये थ्रीडी झेब्रा क्रॉसिंग आखण्याच्या प्रस्तावाला 'ग्रीन सिग्नल' मिळाला असून, पालिकेच्या अंदाजपत्रकात यासाठी ६० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

शहरात रस्ते ओलांडणे सोपे जावे, यासाठी त्रिमितीय झेब्रा क्रॉसिंग तयार करण्याचा प्रस्ताव मागील अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे.

वाहतूक शाखेने येरवडा येथील मुख्यालयाच्या आवारात आणि बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (बीएमसीसी) समोरील रस्त्यावर 'थ्रीडी थर्मोप्लॅस्टिक पेंट' झेब्रा क्रॉसिंगची प्रायोगिक तत्वावर आखणी केली होती. याबाबतचे वृत्त दै.'प्रभात'ने सर्वात आधी प्रकाशित केले होते.

### वाहतूक विभाग-पालिकेच्या रचनांमध्ये फरक

शहरात थ्री-डी झेब्रा आखण्याचा प्रस्ताव वाहतूक विभागाने मागील काही महिन्यांपूर्वी दिला होता. मात्र, महापालिका आणि वाहतूक विभागाच्या रचनेमध्ये फरक असल्याचे चित्र आहे. वाहतूक शाखेचे थ्रीडी क्रॉसिंग पांढऱ्या ठोकळ्यांप्रमाणे दिसते. तर महापालिकेच्या थ्रीडी क्रॉसिंगच्या आखणीमध्ये पांढरा, निळा आणि पिवळ्या रंगाचा वापर केला आहे. दोन्ही यंत्रणांच्या रचनांमध्ये फरक असल्याने रस्त्यावर नेमके कोणते 'क्रॉसिंग' दिसणार, हा विषय औत्सुक्याचा ठरणार आहे.

### काय आहे 'थ्री-डी क्रॉसिंग'?

'थ्री-डी झेब्रा क्रॉसिंग' हा 'ऑप्टिकल' भ्रम आहे. यामुळे वाहनचालकांना रस्त्यावर बॉक्स असल्यासारखे वाटणार आहे. परिणामी वाहनचालकांकडून जंक्शनजवळ वेग कमी होणार आहे. वाहनांचा वेग कमी झाल्याने अपघातांचे प्रमाण देखील कमी होण्यास मदत होणार आहे. पादचाऱ्यांना देखील सुरक्षितपणे रस्ता ओलांडता येणार आहे. प्रामुख्याने युरोपियन देशांमध्ये 'थ्री-डी' तंत्रज्ञानाचा वापर करून झेब्रा क्रॉसिंग तयार केले आहेत. याच धर्तीवर दोन वर्षांपूर्वी दिल्ली येथील प्रमुख रस्त्यांवर आखणी केली होती.

# वाहतूक नियमांचे पालन करणाऱ्यांकरिता 'पॉलिसी'

## पुणे वाहतूक पोलिसांचा उपक्रम : वाहतूक नियमांचे पालन करणाऱ्यांना मिळणार लाभ



लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणेकरांनी वाहतूक नियमांबाबत अधिक सजग आणि जागरूक होऊन नियमांचे पालन करावे, या हेतूने पुणे वाहतूक पोलीस आणि खासगी विमा कंपनीच्या वतीने अभिनव उपक्रम सुरु करण्यात येणार आहे. यात वाहतूक नियमांचे पालन करणाऱ्या पुणेकरांना मोटार विमा खास सवलतीत मिळेल. नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबद्दल जागरुकता वाढीस लागावी, या उद्देशातून या प्रकारच्या उपक्रमाची आखणी केली आहे.

गुरुवारी पुणे पोलीस आयुक्तालयात झालेल्या पत्रकार परिषदेत याविषयीची माहिती दिली. या पत्रकार परिषदेला पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अतिरिक्त पोलीस आयुक्त (प्रशासन) डॉ. संजय शिंदे, अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे, खासगी विमा कंपनीचे सीईओ तपन सिंघेल आणि ससिकुमार अदिमामू हे उपस्थित होते.

डॉ. व्यंकटेशम म्हणाले, "२०१८मध्ये २४० जणांना जीवघेण्या अपघाताला सामोरे जावे लागले. २०१९मध्ये ही संख्या १९७ इतकी आहे. प्रशासनाने सातत्याने राबविलेल्या विविध वाहतूक नियमांच्या उपक्रमामुळे ४३ जीवघेणे अपघातात जीव वाचवता आला. यापुढील काळात वाहतुकीची शिस्त आणि नियम पाळणाऱ्यांकरिता मोटार विम्यात सवलत देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

वर्षभरात ज्या वाहतूकदारांनी नियमांचे पालन केले आहे, त्यांना यात सहभागी होता येईल. पुण्यासारख्या शहरात याप्रकारच्या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यास इतर जिल्ह्यांतदेखील तो राबविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

- सिंघेल यांनी इन्शुरन्सविषयी माहिती दिली. ते म्हणाले, "वाहतूक नियमपालनाला चालना मिळावी, याकरिता मोटार वाहन इन्शुरन्स सवलतीत देण्याचा मानस आहे. याकामी पुणे वाहतूक पोलिसांचे सहकार्य मिळणे, ही निश्चितच आनंदाची बाब आहे." विम्याचा लाभ घेण्याकरिता नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन सिंघेल यांनी केले. विम्याकरिता वर्षभराचा कालावधी ठेवला असून त्यात कुठल्याही प्रकारचा दंड न झालेल्या नागरिकांना सवलतीत विमा काढला येईल.